

शब्दांमृत®
विलास जैन
NEW ERA'S SELF HELP
हे कार्य नव्हे क्रांती आहे

## समर्पन

हा ‘शब्दांमृत’ काव्यसंग्रह

सर्मपीत आहे,

निसर्गाच्या त्या रक्षकांसाठी

जे ह्या धरतीला

त्यांची संपत्ती नाही,

तर त्यांच्या भावी पिढीची

ठेव मानतात.

आपणा पासुन मला प्रेरणा मिळते.

– विलास जैन

# शब्दांमृत®

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन | : | प्रथम |
| प्रकाशक | : | न्यू ईरा सेल्फ हेल्प (मार्केटींग) इंडिया लि.<br>जळगाव – ४२५ ००१.(महा.) |
| कवि | : | विलास जैन |
| प्रति | : | १००० |
| चित्रांकन | : | न्यू ईरा सेल्फ हेल्प (मार्केटींग) इंडिया लि., जळगाव |
| अक्षरांकन | : | न्यू ईरा सेल्फ हेल्प (मार्केटींग) इंडिया लि., जळगाव |
| निर्मित | : | न्यू ईरा सेल्फ हेल्प (मार्केटींग) इंडिया लि.<br>जळगाव – ४२५ ००१.(महा.) |
| मुद्रक | : | विश्वरुपा प्रिंटस्, जळगाव. |

© New Era Self Help Marketing India Ltd.
All Right Reserved 2011
New Era Self Help Marketing India Ltd. is registered in India under Public Ltd. Company Act 1956 Reg. No. - U 51909 MH 2002 PLC 138100

**सर्वाधिकार :**
या कविता संग्रहातील सर्व भाग, चित्र पुर्व परवानगीशिवाय पुनमुद्रित केले जाणार नाहीत. या प्रकाशनाबाबत अनधिकृत काही प्रकाशन आढळल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थेवर कायदेशीर कारवाई केली जाईल.

हे कार्य नाही क्रांती आहे

# प्रस्तावना

आजच्या ह्या धकाधकीच्या जीवनात आम्ही अनेक चुकीच्या गोष्टी, सवयींमध्ये अडकतो. अनेक मन संबंधित विकार जसे क्रोध, भय, चिंता, निराशा, लोभ, गर्व, अहंकार, तान आम्हाला घेरु शकतात, आणि घेरत आहेत. आज आमच्या मध्ये बहुतांश लोक चुकीच्या आणि नकारात्मक विचारामुळे जीवनाचा आनंद व हवा तितका विकास करु शकत नाही. अशात या कविता संग्रहाच्या माध्यमातून विव्हळणाऱ्या हृदयावर, मनावर फुकंर घालण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे. संघर्षाशी लढण्यासाठी संकटावर मात करण्यासाठी नव्या पिढीला एक नवा सकारात्मक दृष्टीकोन मिळेल असा प्रयत्न केला गेलेला आहे. थकलेल्या मनाने परत अकुंरित व्हावे म्हणून प्रोत्साहन पर कविता समाविष्ट केलेल्या आहेत. काही कवितांमध्ये जीवनाच्या अवाजवी अपेक्षा कमी करण्याचे आव्हान केले गेलेले आहे आणि सर्व कवितांची गुंफन ही अध्यात्मीक धाग्यामध्ये केलेली आहे. निसर्गामध्ये, देवामध्ये विश्वास ठेऊन केली गेलेली आहे. संकटसमयी, संघर्षासमयी निर्माण होणाऱ्या अनेक दु:खद भावनांशी कसे जुळवून घ्यावे हे साध्या आणि सोप्या भाषेत वाचकांसमोर हळूवार उलगडलेले आहेत. कविता ह्या गुलाबाच्या सुगंधीत पाकळ्यासम नाजूक, भावनांनी ओतप्रोत तर आहेच पण सरळ तुमच्या हृदयात स्थान मिळविण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे असे मला वाटते.

जर या '**शब्दांमृत**' कविता संग्रहाच्या माध्यमातून काही वाचकांना संकटांसी, संघर्षांसी व्यवस्थित सामोरे जाता आले तर मला अतिशय आनंद होईल. आणि तोच ह्या कविता संग्रहाचा मुळ उद्देश आहे. ह्या कविता संग्रहाचे प्रकाशन हे कोणत्याही प्रकारचा नफा कमविण्यासाठी केले गेलेले नाही. जर काही नफा ह्या काव्यसंग्रहाच्या विक्रीतून मिळालाच तर तो निर्सगसंवर्धना करीता वापरला जाईल जेणे करुन भावी पिढीला बहरण्याकरीता आम्ही एक सुंदर सुखद पृथ्वी सोडून जावू शकु.

धन्यवाद !

आपणा पासुन मला प्रेरणा मिळते

**विलास जैन**

हे कार्य नाही क्रांती आहे

# अनुक्रमणिका


१) उंच भरारी .................. ०१
२) कष्ट ....................... ०२
३) एकच लक्ष .................. ०३
४) निराशा ....................... ०४
५) एकटा .................. ०५
६) अडचणी ....................... ०६
७) आशा .................. ०७
८) उपकार ....................... ०८
९) हृदय .................. ०९
१०) ध्येय ....................... १०
११) जीवनाची नाव .................. ११
१२) जागा तरुणांनो ................ .... १२
१३) तारुण्य .................. १३
१४) अवघड ....................... १४
१५) उत्कर्ष .................. १५
१६) शिक्षण ....................... १६
१७) संकट .................. १७
१८) सहज ....................... १८
१९) आनंद .................. १९
२०) साईलेंट मोड ....................... २०
२१) रिसेट .................. २१
२२) जीवन जगणे .................. .... २२
२३) डेड एन्ड ( रस्ता संपला) ............ २३
२४) प्रेम ....................... २४
२५) जीवन .................. २५
२६) क्षण ....................... २६
२७) बचत .................. २७
२८) व्यसन ....................... २८
२९) शंका .................. २९
३०) उदासीनता ....................... ३०
३१) दारु .................. ३१
३२) हुर हुर ....................... ३२
३३) नशीब .................. ३३
३४) गवसणी ....................... ३४
३५) उणीव .................. ३५
३६) अनित्य ....................... ३६
३७) मी मोठा .................. ३७
३८) स्वागत नव्या पिढीचे ............... ३८
३९) पश्चाताप .................. ३९


हे कार्य नाही क्रांती आहे

# उंच भरारी



घे उंच भरारी
गगनावरी गरुडापरी
दश दिशा तुज पुकारी

घेऊन दोन
डोळ्यात स्वप्न
बन तु कष्टकरी
पसरवुन दोन
बाहुंचे पंख
मार विजयाची ललकारी

रोऊन दोन्ही
पाय जमिनीवर
उचल आभाळ
दोन्ही हातावरी
उचलुन आण
स्वर्गातुन गंगा
महान भागिरथा परी

विश्वास ठेव स्वता:वर
ध्रुवबाळा परी,
तडपत रहा
ध्रुव ताऱ्यासम
आभाळावरी

हरवून आळस
निष्क्रयतेला
नाच कष्टाच्या तालावरी
पाखरु इवलासा
मारत गिरक्या
उडतो नभावरी

तुच काय तो
थबकुन बसला
चल उडण्याची कर तय्यारी
स्वप्न तुझे
साकार होतील
जाऊन पैल तिरावरी

पार करशील
विषमतेचा सागर
मारुन तु गगन भरारी
आशा करु नको
पारसाची
उठ दाव उभारी...



## कष्ट

जर जीवन
जगायचे असेल उत्कृष्ट
तर करणे कष्ट
हा उपाय सर्वश्रेष्ठ

आठवा ती
मधमाशीची गोष्ट
साठवून एक एक कण
ती बनली होती श्रेष्ठ

आपला देश आहे
नैसर्गिक संपत्तीत सर्वात श्रेष्ठ
जर उपसले नाही कष्ट
तर होईल सर्व काही नष्ट

वय दहा वीस
असो वा पासष्ट
कष्टाला नाही पर्याय
हे आहे सुस्पष्ट

जर पळाले दूर
कष्टापासून लहान, थोर, वरिष्ठ
तर निष्क्रीयता वाढेल
समाज होईल भ्रष्ट

सूर्य, चंद्र, नदी, पृथ्वी
उपसतात खुप कष्ट
म्हणूनच बनते
माणसाचे जीवन उत्कृष्ट



# एकच लक्ष

लक्ष,फक्त एकच लक्ष
वादळाबरोबर पळायचे
विजे सम चमकायचे
पाऊसासम जीवन द्यायचे


लक्ष फक्त एकच लक्ष
समुद्रासम सारगर्भीत व्हायचे
नदीसम झुळ झुळ वाहायचे
तलावासम आपल्या
सीमेमध्ये रहायचे

लक्ष फक्त एकच लक्ष
निसर्गा सम दोन्ही हाताने द्यावयाचे
वाऱ्यासम आनंदाने हिंदोळे घ्यायचे
फुलासम सुहास दरवळायचा

लक्ष फक्त एकच लक्ष
अग्नी सम जळून पावन व्हायचे
पाण्यासम निर्मळ व्हायचे
धरतीसम वंदनीय व्हायचे

लक्ष फक्त एकच लक्ष
चंदनासम झिजायचे
पर्वतासम खंबीर व्हायचे
वृक्षासम सावली द्यायच

लक्ष फक्त एकच लक्ष
पिकासम जीवन अर्पायचे
पक्ष्यासम भुखे राहून
पिलांना भरवायचे
लक्ष,फक्त एकच लक्ष



## निराशा

निराशा असावी
श्रावणाच्या ऊन सावली सम
ग्रीष्म ऋतुच्या
चिरकाळ टिकणाऱ्या
उन्हासम नसावी

हवेने भरलेल्या
फुग्या सम निराशा असावी
गाडीच्या चाकात भरलेल्या
हवे सम नसावी

भरती आहोटी सम
निराशेचा खेळ असावा
दु:खद भावनेने ओतपोत
भरलेला हा डोह नसावा

सूर्य चंद्र ग्रहणासम
काही क्षण निराशा यावी
इंद्रधनुष्यासम चकीत करुन
निघून जावी

ओंजळीत धरलेल्या पाण्यासम
ती गळून जावी
पाण्यात उमटलेल्या तरंगा
सम विलीन व्हावी

अमवास्येच्या एका रात्री
सम ती यावी
रात्र मग ढळता ढळता
पहाट व्हावी

निराशा श्रावणाच्या
ऊन सावली सम असावी

# एकटा

मी एकटा
डोक्यात विचारांचे थैमान
पेटवले पुरुषार्थाचे रान
पचवला किती अपमान
मग मिळाला सन्मान

मी एकटा
डोळ्यात स्वप्न होते महान
विसरलो भुक आणि तहान
दिला दोन्ही बांहुना तान
मग मिळाले लक्ष्मीचे वरदान

मी एकटा
ह्रदयात देशाचा सन्मान
ठेवले शाबुत आपले इमान
प्रयत्न केला
मिळवीन्या आत्मसन्मान
मग मिळाले समाधान

मी एकटा
शोधत होतो जीवनाचे निदान
अभ्यासले किती विद्वान
दिला बुद्धीला ताण
तेव्हा मिळाले विद्यादान




# अडचणी


जीवनातील अडचणी
पडल्या अंगवळणी
सुटका नाही तुमची
ह्या पासुन एक क्षणी

सुख दुःखात
जानवतात जास्त मनी
होते पुरुषार्थाची
ह्यात मळणी

ह्या विणा वाटतात
भाकरी ह्या अळणी
ही हो आहे
जीवनाची चाचणी

फुल बहरण्या अगोदर
नसते कोणाच्या ध्यानी
तसेच मोठ्या यशासाठी
पार कराव्या
अडीअडचणी





# आशा

धरतीच्या पोटामध्ये
बीजे अनेक झोपली
माणसाच्या मनामध्ये
तशी आशा लपली

रुजते कोणते बीज
केव्हा ते कळेना
उमलते आशा कोणती
गुढ हे उमजेना

आशेचा इवलासा
अंकुर घेतो गगनभरारी
अडवता थांबेना
हा कधी कोणापरी

आशेत बघा लपले
जगण्याचे हे इंधन
आशेतुन बहरते
सुंदर नंदनवन

आशेच्या सहाय्याने
व्हा संकटातून पार
आशेच्या वाटेवर
बघा बहरेल संसार

## उपकार

नसा नसातुन आनंद वाहतो
नाही याला काही पारावार
सकारात्मक विचारांचा
बघा कोणी दिला उपहार

सात्विक सुंदर बनले
बघा माझे सर्व आचार
पुरुषार्थाच्या घोड्यावर
झालो कसा मी अस्वार

आज मनातून आनंदाचा
झरा वाहतो आहे
वाटून सर्व जगाला
शिल्लक उरतो आहे

सुविचारांना वाटून यांचा
ठेवा न सरतो आहे
प्रत्येक क्षणी जीवनात
नवीन उत्साह भरतो आहे

सत्कर्माने करीत आहे
मी जीवनाचा उध्दार
देवा मानतो तुझे
मी फार उपकार



## हृदय

हृदय इवलेसे
जसे पाखरु
स्वप्न आभाळा ऐवढे
कसे सर करु

स्पंदने हळुवार
जसे वासरु
स्वप्न बेभान घोडे
कसे यांना सावरु

स्वप्न बघून
हृदय उघडवू
का हृदयाच्या गतीने
स्वप्न उभारु

स्वप्न आणि हृदयात
चला पुल उभारु
दु:ख व अपेक्षाभंग
आता आपण विसरु

## ध्येय

ध्येय असावे कसे
जळून वितळून लोह
आपले गुणधर्म
सोडत नाही जसे

ध्येय असावे कसे
चिखलामध्ये राहूनही
कमळ आपली सुंदरता
सोडत नाही जसे

ध्येय असावे कसे
पाण्यामध्ये पडूनही
तेल आपले अस्तीत्व
स्वतंत्र ठेवते जसे

ध्येय असावे कसे
ढगामागे लपला जरी
तरी सूर्य आपली
उब कायम ठेवतो जसे

ध्येय असावे कसे
कोणत्याही स्वरुपात गेला
तरी सोने आपली
किंमत कायम ठेवतो जसे

ध्येय असावे कसे
पाण्याच्या प्रवाह
सर्व अडचणी
आपल्या बरोबर
वाहून नेतो जसे

## जीवनाची नाव

जीवनाची नाव
जाते वाहत

कधी संथ पाण्यात
तर कधी वादळात

कधी हेलकावे खात
कधी लंगर पाण्यात

कधी जाते
चुकीच्या दिशेत

तर कधी
पाणी नावात

मधेच कधी
खडक असतात

तर कधी
समुद्र थिजतात

कधी आल्हाद
वारे वाहतात

तर कधी किनाऱ्याची
आस जगवतात

नाव शेवटी
येते किनाऱ्यात

विश्वास ठेवा
फक्त आपल्यात



# जागा तरुणांनो

निष्क्रीयता आणि भ्रष्टाचाराने
केला देशाचा घात
जागा तरुणांनो
तुम्ही कोठे आहात

ह्या करीता लढले
नव्हते स्वातंत्र सैनिक
नव्हता आवळला
ह्या करीता
गळ्या भोवती फास
जागा तरुणांनो
तुम्ही कोठे आहात

पक्ष, जात, पात,
धर्म, पंथ यांच्या
तोडा बेड्या
फेका ह्या लाचारी,
अन् हिन भावनेच्या कुबड्या
धरु चला
सर्व मिळूनी
विकासाची कास
जागा तरुणांनो
तुम्ही कोठे आहात

ह्या धरतीला लागली
फक्त तुमचीच आस
पावन भुमीत ह्या
रमले ऋषीमुनी
किती खास
ह्या अशा पावन
भुमीचा केला ह्यांनी
सत्यानाश
जागा तरुणांनो
तुम्ही कोठे आहात

सुख सुविधांचे
तोडा बंधन
करु या शिवचे तांडव
व होऊ द्या
महाकालीचे नर्तन
पेटवु स्वाभीमानाच्या मशाली
अन् घेऊ देशभक्तीची आन
जागा तरुणांनो
तुम्ही कोठे आहात

# तारुण्य

कसे असावे
हे तारुण्य
बेलगाम घोड्या
सम नसावे
भटकणे आरण्य

तारुण्य नाही
फक्त न्याहाळण्या
लावण्य
हे तर क्षण
मिळविण्याचे प्राविण्य

वेळपट, बावळट,
भोंडे नसावे तारुण्य
असावे ध्येयनिष्ट
आणि नयनरम्य

तारुण्य पिटीका
जरी असल्या तोंडावर
असावा विश्वास
उडण्याचा आभाळावर

बेकाबु वासनांचे
नसावे त्यात वादळ
आपुलकीच्या हृदयांने
हळूच उघळाव कावळ

नसावा तो
तारुण्य सुलभ उश्रुखंलपणा
सळसळत्या तारुण्याने
ओढावा सभ्यपणा

नसावा ह्या वयात
प्रेमाचा लपंडाव
जिकांवा तारुण्याने
विजयाचा डाव

आकर्षण नसावे
सुख संबीधांचे
क्षण हे आहे
सरस्वतीच्या साधनेचे

# अवघड

अवघड शब्द
वाटतो किती जड
कष्टावीना मिळाले का
कुणाला फळ

सुरुवातीला कोणतेही
काम वाटते अवघड
एकदा वाहून गेला
निष्क्रीयतेचा मळ

मग वाटते सर्व काही
सोपे आणि सरळ
सोपे वाटते अवघड
जर वाढली वळवळ

थोडी काढावी लागेल
त्याकरीता कळ
घाबरू नकोस पडुदे
अंगावर पुरुर्षार्थाचे वळ

अवघड शब्द जड
पण ते घेऊन पळ
चांगल्या गोष्टी दिसतील
त्या दिशेला वळ

हो सर्व संकटांना
वरचढ ध्येयपूर्तीचे बघ
मिळतील मग
तुला गोड फळ



## उत्कर्ष

करावा लागतो
याकरीता संघर्ष,
मग मिळतो उत्कर्ष
होतो जीवाला हर्ष

प्रयत्न करावे लागतात
दिवस, महिने, वर्ष
संकटांना सामोरे
जायचे असते सहर्ष

प्रत्येक कामामध्ये
लागतो ह्याचा स्पर्ष
वेळेचे खत पाणी टाकूनच
वाढतो उत्कर्ष

आवश्यक हा
चालवीण्या चरीतार्थ
उत्कर्ष संभव नाही
विना पुरुषार्थ,

उत्कर्ष मागतो
तुमच्याकडुन सर्वस्व
मगच होता
विजयावर वर्चस्व



## शिक्षण

शेवटच्या क्षणापर्यंत
घ्यावे शिक्षण
सर्व कामातुन आपुल्या
दिसू द्यावे
याचे लक्षण

शिक्षणाविना
न जावा
एकही क्षण
अर्पावे ह्याकरीता
तन, मन आणि धन


श्वासाची गरज
भासते ह्र्दयाला
शिक्षणांचे इंधन
तसेच लागते
चालविण्या बुद्धीला

प्रतिस्पर्धेच्या युगात
शिक्षणावीना जीवन
कल्पना ही आहे
करता न येणारी सहन


शिक्षणाची गरज
जीवनात पडते
करण्या शरीराचे
आत्माशी मिलन

बऱ्या वाईटांचे
भेद करुन
सोपे करते
जीवन दर्शन

शिक्षण घडवते
जीवन विलक्षण
मातृभूमिच्या कामा येते
शरीराचा प्रत्येक कण








# संकट

संकट येतात
कळत नकळत
सोडतात माणसाला
दु:खात विव्हळत

जेव्हा माणुसकीचा
ओलावा जातो वाळत
पुरुषार्थाला माणुस
जातो टाळत
वाईट गोष्टींची
जेव्हा ठेवतो पाळत
तेव्हा लक्ष्मी घेते
तेथुन पाय काढत
तेव्हा संकट येतात ...

जेव्हा जबाबदारी पासून
माणुस घेतो तोंड वळत
इमानदारी पडते
जेथे सडत
गप्पा आणि माश्या
बसतो मारत
जेव्हा घर
बनवतो हवेत
तेव्हा संकट येतात...

जेव्हा माणुस जातो
चांगल्या कामांना नडत
समजतो सगळे काही
पण काही नाही वळत
बऱ्या वाईट गोष्टींमधला
भेद नाही कळत
अहंकार ज्याचा
जातो चढत
तेव्हा संकट येतात ..



# सहज

आनंद असावा सहजानंद
तोच ठरेल परमानंद

सहज असावे सुख
आणत नाही
ते सोबत दु:ख

सहज असावी सुंदरता
तीच दाखवेल
निसर्गाची भव्यता

सहज असावे जीवन
जगमगेल
त्यातूनच त्रिभुवन

सहज यावे
मृत्यूला शरण
सोडावे दुसऱ्यांकरिता
जगण्याचे हे कुरण

सहज व्हावा उत्कर्ष
नसावा त्याकरीता
कोणता संघर्ष

# आनंद

बघा असावा
जीवनात
आनंद हा
प्रत्येक क्षणात

शोधावे त्याला
कधी निसर्गात
किंवा न्याहाळावे
कधी आकाशात

दरवळतो कधी
हा फुलांच्या सुगंधात
कधी डोकावतो
फुलांच्या रंगात

रेंगाळतो कधी
हा नदी नाल्यात
तर लोंबकळतो
कधी सुखद संबंधात

कधी भेटावे
रांगोळी काढून
त्याला अंगणात

कधी असतो
तो सणात
लपून बसतो
कधी मनात

पाझरतो कधी
मधुर गाण्यात
कधी असतो
प्रियजनांच्या भेटण्यात

शोधायचे असेल
जर याला ह्या विश्वात
तर हा वसतो
फक्त हृदयात



## साईलेंट मोड

साईलेंट मोडमध्ये टाकू
चला जीवनाला
उपभोगू स्वाभाविक सुख
सोडू चला शर्यतीला

डोळ्यांनी बोलु आणि समजु
हृदयाच्या भाषेला
शब्दांनी बोलुन स्वस्त न करु
अलौकिक ह्या भावनेला

शांत साधे पवीत्र जीवन
द्विगुणीत करेल आनंदाला
संग्रहात गुंतलेला वाटसरु
सोड निर्सगाच्या झोळीत
स्वत:हाला

क्षणोक्षणी आनंद मनवु
क्षण तो आला अन् गेला
आनंद पथाचा तु वारकरी
ह्या साठीच जीवनी आला

## रिसेट

रिसेटचे बटन
जर असत जीवनाला
कटू आठवणींच्या चिंता
असत्या मग कशाला

रिसेटचे बटन दाबताच
मागील अध्याय संपला
नव जीवनाची सुरुवात
नवीन बहार अन्
नवीन वसंत आला

दुरावले नसते कुणी
संबंध गेला असता परत जोडला
चुका दुरुस्त झाल्या असत्या
आराम मिळाला असता जीवाला

नवजीवन मिळाले असते
कंटाळवाण्या संबंधाला
जग किती सुंदर असते
जर एक संधी
पुन्हा मिळाली असती सर्वांना



# जीवन जगणे

जीवन नसते
फिरायला वन वन
वेगळाच असतो
प्रत्येकाच्या जीवनाचा फन

आनंदी असावे मन
सुदृढ असावे तन
बुध्दीने नाही तर ह्रदयाने
जगावे जीवन

जीवनात ताब्यात
असावे मन
म्हणजे मग थांबेल
जीवनाची अनावश्यक भटकन

जीवन जगावे जसे
आहे हे रण
प्रत्येक क्षणी करावे
पुरुषार्थाचे अवलंबन

जीवनात नसावी
सूर्य चंद्राची आशा
संग्रह न करावा
गोष्टीच्या बाश्या

किती जन्मे फिरुन
मिळाले अमुल्य जीवन
फुलवा जीवनाचा बगीचा
करा याला मधुबन

निर्सगाच्या सेवेसाठी
घालवावे जीवन
सत्कर्माचे विळे उचलावे,
घाव्ये त्याकरीता
तन, मन–धन



## डेड एन्ड (रस्ता संपला)

कधी वाटते
सर्व काही करुनही
रस्ता संपला,
आयुष्याचा फार मोठा
हिस्सा जगायचा उरला

मेहनतीने गोळा केलेली
कर्माची शिदोरी नासली,
संकटाचे भूते
अक्राड विक्राड रुप घेऊन
आपल्या समोर नाचली

एकही पाऊल
पुढे टाकण्यासाठी शरीरात
प्राण नाही उरला,
जाणारा प्रत्येक श्वास
शेवटचा श्वास भासला

बुद्धीची चतुरता ही
जाते ह्या वेळी उडून,
आपले मनही नसते
तेव्हा आपल्या कडून

घाबरायचे नसते
अश्या क्षणी जीवनाला
घट्ट ठेवायचे असते धरुन
ही सारी गंमत
देव पाहत असतो
आपल्या फार जवळून

एक शेवटचा
श्वास आणि वाट
देव देतो आपल्या कडून
जीवन बनवायचे असते सुदृढ
ह्या संधीला पकडून



## प्रेम

प्रेम झाले
मन लागले
कोणा भोवती
पिंगा धरु
सांगा आता
मी काय करु?

ध्येय सोडून
पंख्याला लटकवून
मान मरु
का आवेशाचे
हे इंधन भरुन
आभाळाला धरु?

बघु मी स्वप्न
मिलन अलिंगन
आणि चुंबनाचे
का वळवू
ही एकाग्रता
क्षण घालवू चिंतनाचे?

गोष्टी करु का
मी चांदणे तोडण्याची
का लावू शौर्य
दिवस हे
यश मिळविण्याचे?

विसरु का मी
घर दार
आणि शिक्षण
का लावू
हे धैर्य
जीवन बनविण्या विलक्षण ?

खर्च करु का मी
प्रेमा करीता
तन–मन–धन
का लावू सर्वस्व
कमविण्या विद्याधन?



## जीवन

दिवस हे खेळण्याचे
हसण्याचे आणि गाण्याचे
कधीच संपत नसतात
माणसे ही कधी कधी
अकाली प्रौढ
होत असतात

जीवनाला जे
फार गंभीरतेने घेतात
ते भयाच्या
खोल खाईत पडतात
जीवनाच्या प्रत्येक गोष्टीत
जे आनंद शोधतात
ते उत्साहाच्या हळुवार
हवेत तरंगतात

जे ह्या आयुष्याला
सुवर्ण संधी मानतात
ते प्रत्येक क्षण
हिसकावण्याचा प्रयत्न करतात
पण जे याला देवाची
अमुल्य भेट मानतात
तेच फक्त
परोपकारासाठी जगतात

ज्यांना आयुष्याची फक्त
शंभरी पूर्ण करायची असते
त्यांना याचा मोल नसतो
पण ज्यांना ह्यामध्ये
देवाचा अंश दिसतो
तोच खरा
धरतीवर आनंद लुटतो

जो पुरुषार्थावर आणि देवावर
विश्वास ठेवतो
तोच सर्वांना पुरुन उरतो
ज्यांचा निर्सगावर
विश्वास असतो
तोच खरा जीवनाचे
रहस्य उलगडतो



## क्षण

क्षण बीज जीवनाचे
फुलते हळुवार ह्यातुन
विश्व हे भावनांचे

क्षण रचून
व्यवस्थित ठेवावे
रचनात्मक कामासाठी
ते वापरावे

क्षणोक्षणी जीवन
विलक्षण बनवावे
हसुन जीवनाचे
क्षण वाढवावे

गेलेल्या क्षणांचा
विचार करत
जीवन व्यर्थ
न घालवावे

घालवावे प्रत्येक
क्षणात जीवन
मागे वळून
न बघावे

प्रत्येक क्षणाला
शेवटच्या क्षणा
इतकेचं बहुमूल्य
समजावे

संकटाच्या क्षणात
धैर्य ठेवण्याचे
शिक्षण घ्यावे



# बचत

बचत ठेवते
जीवनभर हासत
जर विसरलो बचत
तर नाही
संकटापासून वाचत

एक एक
थेंब साचवूण
जातो सागर बनत
एका रुपया
पासून हजार
लाखो, करोडो
जातात बनत

व्हावी बुद्धी
शक्ती,वेळेची
सुद्धा बचत
जीवनात ह्या गोष्टी
ठेवाव्या साचत

असावा बुद्धीचा,
शक्तीचा आणि पैशाचा
संचय जीवनात
कारण संकट
येतात जीवनात
कळत न कळत

ठेवावे हे लक्षात
पैशा विना
नाही काही वळत
जस नसेल
पैसा हातात
तर बसाल
तुम्ही विव्हळत



## व्यसन

व्यसन करते दुर्बळ
माणसाचे मन
दुव्यवहार आणि दुष्कर्मे
करत असतांना
घाबरत नाही मन

व्यसनामुळे दुःखी होतो
परिवारातील प्रत्येक जन
पैसा, शक्ती वाया जाते
माणुस फिरतो वन–वन

वाया जातो व्यसनात
घालवलेला प्रत्येक क्षण,
हे आहे वाया घालवणे
बहुमूल्य जीवन

सुरुवातीला विरंगुळा
म्हणून असते व्यसन
नंतर व्यसन वेढते
शरीर आणि मन

शरीर, मन ह्यामुळे
करते आंदोलन
कोणतीही सवय नसावी
करावे याचे मनन



## शंका

शंका हळूवार
झिरपते मनातून वेढते
बुद्धी आणि हृदयाला
माणुस घाबरु लागतो
स्वत:च्या सावलीला

असतात ह्या सर्व
कमकुवत मनाच्या लिला
झोपतांना मखमली गादीसुद्धा
भासतात त्यांना शिला

इवलीशी शंका असते
दुधामधल्या विरजनासम
काबीज करते मन
बनवते सम बाबींना विषम

शंकेमध्ये माणुस
साप समजतो शिखा
दजकून उठतो जरी
हळूवार दाबले नखा

शंकेमध्ये शत्रु बनतो
प्राण प्रिय सखा
सशक्त बनवा मन
शंकेपासून
दूर रहाणे सिखा

शंका एक दिवस
डुबवले सोन्याची लंका,
शंकेणवर विजय मिळवा
सुस्वभावाचा वाजवा डंका



## उदासीनता

जेव्हा घेरते उदासिनता
मनाला वेढते हिनता
पसरते सगळीकडे निरसता
आवडत नाही विविधता

डगमगते मानसिकता
दुभंगते नैतिकता
ग्रासते फक्त वैफल्यता
उरते फक्त निष्क्रीयता

संपते सोशीकता
वाढते नास्तिकता
उरत नाही स्वच्छता
उरते फक्त निस्तब्धता

ढळते मनाची स्थिरता
दूर जाते स्वच्छंदता
उरते फक्त क्रुरता
माणुस होतो भित्रा

चेहऱ्यावर उगवते विषमता
समोर येते फक्त विपरीतता
आवडत नाही चंचलता
उरते फक्त मनाची रिक्तता



## दारु

दारु पिऊन
स्वर्गाला नको नाकारु
सुंदर ह्या जीवनात
संकटाचे पर्वत
नको उभारु

पिऊन दारु, शरीराला
आपल्या नको ललकारु
आहे तु ह्या निसर्गाचा
सुंदर पाखरु

दारु पिऊन रस्त्यावर
आणु नको
बायको आणि लेकरु
सुंदर ह्या जीवनात
उर्किडा नको रे उकरु

सोड नाद ह्याचे
तु आहेस होतकरु
नासवले हिने
किती संसार
आम्हा नका विचारु?

पिऊन हिला
अवदशेस आपल्या
नको तू पुकारु
देवदास जरी बनलास
तरी मिळणार नाही
तुला पारो

जीवन आपले
अल्पकाळ आहे
आपण सर्वजण उतारु
दारुच्या वादळासमोर
टिकेल काय
घर तुझे कौलारु?



## हुर हुर

हुर हुर
नेई मजला
दुर दुर

नागमोडी ह्या
वळणावर
जावे लागणार
किती दूर?

आस कशाची
करते मला अधीर
का झालो
मी बधिर

गवसावा आता
जीवनाचा सुर
नाही माझा
कोणता कसुर

तृप्त व्हावे मी
ना चिंतातुर
दूर व्हावी माझी
ही हुर हुर



## नशीब

जे घडले नाही
ते नशीब
जो जमल
तो पुरुषार्थ
हाच आहे
जीवनाचा सर्वार्थ

जे चांगले झाले
ते मी केले
जे वाईट घडले
ते नशीबी आले
असेच हे
आयुष्य मागे पडले

केली संसाराची
अवदशा
दाखवून नवग्रहाची
वाईट दशा
बघा ह्या सुविधेच्या
गोष्टी कशा

केले यज्ञ,पुजा,
अर्चाना आणि अभिषेक
प्रगतीसाठी प्रयत्न
केले नाही अनेक
हि आहे प्रवृत्ती
बनण्याची सेवक

विविध ग्रहाची
केली शांती
आवडली नाही
तुला कधी क्रांती
बसून मिळेल सर्वकाही
ही आहे तुझी भ्रांती



## गवसणी

आभाळासी घालण्या गवसणी
का करीतो तु प्रयास
वाटत नाही का निर्रथक
आहे तुझा हा अट्टाहास

का अपेक्षा करावी तु
नजर मिळवावी सूर्याच्या नजरेस
का तुझ्यासाठी चंद्र
उगवावा अमावस्येस


अथांग ह्या धरतीवर
प्राणी तु इवलासा
का तुझी ही खुळी
जग जिंकण्याची आशा

आवर तुझ्या ह्या
अती महत्त्वाकांक्षेला
चिटकूण रहा ह्या
सुंदर जमिनीला

मिळाले तुजला जीवन
सृष्टीला सजविण्या करीता
आनंदामध्ये नको
ही निरर्थक भौतिकता



## उणीव



जीवनात राहील उणीव
तु जळू देऊ नकोस
आपला जीव

चंद्रात ही होती उणीव
सूर्य संध्याकाळ होताच
पळतो वाचवून
आपला जीव

उणीवानीच भरलेला
निसर्गातला प्रत्येक जीव
काही गोष्टी नाही
म्हणून का करतोस
स्वत:ची किव

ठेव डोक्यात तु
निसर्गाची जाणीव
मग पचवू शकशील
सर्व प्रकारची उणीव

बघ नसती जर
जीवनात उणीव
तर राहिली नसती तुला
माणुसकीची जाणीव

उणीवाच बनतील
एक दिवस तुझ्या शक्ती
म्हणून ह्या पासून वाचण्याची
करु नकोस युक्ती

# अनित्य

आनंदमयी हे अनित्य जीवन
विस्मयकारक हे सुखद परिवर्तन

अनित्य होती ती गुलामी
अनित्य होती ती सुनामी

अनित्य होते रोगाचे जीवन
अनित्य होते काम क्रोधाचे क्षण

अनित्य होते रुसवे फुगवे
अनित्य होते प्रसंग फसवे

अनित्य होती ती
कंटाळवाणी प्रतिक्षा
अनित्य होती मागणे भिक्षा

अनित्य होते ते
अवाजवी बंधन
अनित्य होते दुखदाई संबंध

अनित्य होता अहंकार माझा
अनित्य होता तो गाजा वाजा

अनित्य होते रडणे कुढणे
अनित्य होते उडणे पडणे

अनित्य होती बेकाबू वासना
अनित्य होत्या हारण्याच्या यातना

अनित्य होता तो अभिमान
अनित्य होते ते आपमान

अनित्य होते ते कर्ज सारे
अनित्य होती ती काट कसर

अनित्य होता प्रेमभंग
अनित्य होता कुख्यातांचा संग

अनित्य होती निष्क्रीयता
अनित्य होती प्रतियोगिता

अनित्य होती निरसता
अनित्य होती मुर्खता

अनित्य होते ते डरणे
अनित्य होते लवकर थकणे

अनित्य होता तो संताप
अनित्य होता पच्छाताप

अनित्य होती ती मुर्च्छा
अनित्य होती ती शिक्षा

अनित्य होती ती दुर्दशा
अनित्य होती ती खोटी प्रशंसा

आनंदमयी हे अनित्य जीवन
विस्मयकारक हे सुख:द परिवर्तन

# मी मोठा


मी मोठा तु मोठा
हा खेळ आहे खोटा
ह्या दुनियेत
प्रत्येकाचा अपुला अपुला वाटा

सुंदर जगणे सोडून
का फोडला हा फाटा?
जगण्याची गती वाढवूण
केले जीवनाला उसळत्या लाटा

जाणे होते कोठे
पोहचला कोणत्या काठा
का विसरलास सर्व काही
फक्त करण्याकरीता साठा

भरण्या करीता सांग
किती मोठा
आहे तुझा कोठा
किती मोठा झाला म्हणजे,
जाणार नाही
सांग तु वैकुंठा

सोड आता
ही प्रतियोगिता
आणि त्याग
मनाची कुंठा
न संपणाऱ्या ह्या
शर्यतीत भाग घेऊन
का बनवतोस
आपले जीवन वाळवंटा



## स्वागत नव्या पिढीचे

तु शिकुन आलास
थांब तुला ओवाळु दे

टाकू दे तुझी नजर
नजर ध्येयावर,
तुझी स्थिरावू दे
थांब तुला ओवाळु दे

वयानुरुप राग, चिड,
चंचलता असेल तुझ्यामध्ये
जोड्या बरोबर ती
दारावर काढावी
हे मला समजावून दे
थांब तुला ओवाळु दे

परंपरा, संस्काराच्या बेड्या
पेलतांना तु
कासावीस होत असशील
आशेने भरलेल्या
थंड पाण्याचा ग्लास
तुझ्या हातात देऊ दे
थांब तुला ओवाळु दे

न थकता सहन
करण्याची क्षमता
अजुन तुझ्यात
आली नसेल
प्रकाश आणि थंड हवा देऊन
थकवा पडवणारी
खिडकी मला खोलू दे
थांब तुला ओवाळु दे

स्वप्न भंग, प्रेम भंग
यामुळे तु
व्यथीत होत असशील
एकाच वेळेस
धरती अन् आकाश
आपल्याला मिळत नाही
हे मला समजावून दे
थांब तुला ओवाळु दे

## पश्चाताप

डोळ्यात अश्रू
अंगात काप
मनातून निघते
दु:खाची वाफ

कळत न कळत
होतात चूका व पाप
उरतो मग मागे
फक्त पच्छाताप

संबंध, संपत्ती, वेळ
बसतो याला काप
काही गमवल्याचे
दु:ख होत अमाप

चुकलो हे समजने
ह्दय बुद्धीचा मिलाप
मनाला दंडीत करण्या
होतो पच्छाताप

पच्छाताप करीत
करु नका क्रियाकलाप
फक्त ह्दय मोकळे सोळा
मन करा साफ





पब्लिकेशचे पुढील समाजोपयोगी साहित्य

# नवनिर्माण®

चार भागात



हे कार्य नाही क्रांती आहे

# आभार

त्या सर्वांकरीता जे
दुसऱ्यांसाठी चांगले आहेत...
चांगले होण्यासाठी सदैव
तत्पर आहेत...
चांगले होण्यासाठी सदैव
प्रार्थना करतात...
चांगले करण्याकरीता
भरपूर मेहनत करतात...
चांगल्या व्यक्तीची मनापासून
प्रशंसा करतात...
आणि प्रत्येक वेळी चांगल्या
कामामध्ये
तन मन धन
देण्यासाठी तयार असतात..

आपणा पासुन मला प्रेरणा मिळते.

**– विलास जैन**

## माझी ओळख



मी एक ऊर्जा आहे. निरंतर वाहणारी ऊर्जा. कोणत्या लिंग, भेद, धर्म आणि आकारात आपल्या समोर उपस्थित आहे, फक्त त्यानेच माझी ओळख समजु नका. आपण माझ्या ज्या कार्यांना विकास, उत्साह, आनंद, कार्यक्षमता, आस्था, प्रोत्साहन अशा अनेक मोठ्या शब्दांनी संबोधंता ती फक्त माझ्या जीवनाची धारा आहे. मी अनेक वेळा तुमच्या जीवनात येतो आणि निघून जातो. काही वेळ तुमच्या सोबत चालतो त्याला तुम्ही माझे सहकार्य समजता. कृपया हे जाणून घ्या की आपल्यामुळेच माझे जीवनक्रमण सहज व आनंदादायी बनते. अनेक वेळा आपल्याला माझ्यामुळे जाणता किंवा न जाणता काही लाभ होत असेल, काही वस्तु प्राप्त होत असतील. कृपा करुन त्या करीता मला धन्यवाद म्हणू नका. कारण मी बनलाच त्या करीता आहे. हो, पण जर माझ्याने काही चुक झाली तर मला आपण दयाळू हृदयाने माफ कराल अशी आशा बाळगतो. तुमच्या पासुन मला निरंतर जीवन जगण्याची प्रेरणा मिळते.

धन्यवाद..!

आपला विनम्र
विलास जैन

हे कार्य नाही क्रांती आहे

किंमत : रु. १००/-